# शाळेचा पहिला दिवस

या वर्षी गंमतच झाली.

जोशूच्या शाळेचा पहिला दिवस वेगळाच होता.

पताका लावून शाळा सजली होती.

स्वागताला गावातली मंडळी जमली होती.

शिक्षिका तर हाताला धरून वर्गात नेत होत्या.

वर्ग तर साफ बदललेलाच होता..........

बाके वर्गातून निघून गेली होती,

गंमती-जमतीचे खेळ, रंगीत साधने

गणिताच्या पट्ट्या वर्गात मांडल्या होत्या.

मुलांना छोट्या छोट्या गटांत बसविले

समोरच्या साधनांवर खेळायला सांगितले

बाईंनी काही शिकवलेच नाही

नेहमीसारखे कोणी रागावलेच नाही.

जोशूने घरी येऊन सांगितले

आमची शाळा बदलली आहे !

वर्गात आता वेगळेच वाटते!

खूप काही करावेसे वाटते!

शाळेबरोबर जोशूही हळू हळू बदलू लागला आहे !